## रे.मु.नं. १७५/२०१० मधील निशाण क्र.१४२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रस्तुत दाव्यातील मयत प्रतिवादी यांचेबाबत सरनाम्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीचे कथन असे की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादी यांचे विरुध्द दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालू असताना यातील प्रतिवादी क्र.२ ताराबाई रामचंद्र पवार या दि.२०.११.२०२३ रोजी तर प्रतिवादी क्र.१२ कोंडीबा मारुती पवार हे दि.३१.०६.२०१६ रोजी मयत झालेले आहेत. मयत प्रतिवादी क्र.२ व १२ यांचे वारस यापूर्वीच दाव्यामध्ये समाविष्ट केलेले आहेत. त्यामुळे सदर दाव्याचे सरनाम्यातून मयत प्रतिवादी क्र.२ व १२ यांचे नावे वगळण्यात येवून तद्‌अनुषंगिक दुरुस्ती करण्याची परवानगी असावी अशी विनंती केली.

०३. सदर अर्जास प्रतिवादी क्र.३ तर्फे म्हणणे देण्यात आले. त्यांनी आपल्या म्हणण्यात असे नमूद केले की, अर्जातील कथन खरे व कायदेशीर नसून सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव होवुन, वाटप होवुन व पृथक कब्जा मिळणेकामी दाखल केलेला आहे. सदर अर्जामध्ये वादीचे असे कथन आहे की, दाव्याचे कामकाज चालू असताना सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ ताराबाई रामचंद्र पवार या दि.२०.११.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ नि.१३१ वर मयत प्रतिवादी क्र.२ यांच्या मृत्युचा दाखला सादर केलेला आहे. तसेच सदर दावा चालू असताना प्रतिवादी क्र.१२ कोडिंबा मारुती पवार हे दि.३१.०६.२०१६ रोजी मयत झालेले आहेत. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ नि.१३३ वर मयत प्रतिवादी क्र.१२ यांच्या मृत्युचा दाखला सादर केलेला आहे. वादीचे असे कथन

आहे की, मयत प्रतिवादी क्र.२ व १२ यांचे वारस यापूर्वीच दाव्यामध्ये समाविष्ट केलेले आहेत. सदर कथनांच्या पुष्ठ्यार्थ सदर प्रतिदाव्यातील वादीने नि.क्र.१७४ वर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.२ व १२ यांची नावे दाव्याचे सरनाम्यातून वगळून दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेस विनंती केली. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही, तसेच सदर दुरुस्तीने प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.२ व १२ यांची नावे सरनाम्यातून वगळणेस व तद्अनुषंगिक दुरुस्ती मुदतीत करणेस परवानगी देण्यात येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांक – १२/१२/२०२४.

SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Digitally signed by SACHIN SAMBHAJI SALUNKHE
Date: 2024.12.13 11:03:10 +0530

(एस.एस. साळुंखे)
३रे दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.